**पोलीस उप-आयुक्त, सायबर गुन्हे, गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडुन जनतेस आवाहन करण्यात येते की,**

**PayTM, Phone Pay, Google Pay, Amazon Pay इत्यादी डिजिटल पेमेंट ॲप्लिकेशन सारख्या बनावट ॲपचा वापर करुन त्याद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासुन सावधानता....**

सध्या डिजिटल पध्दतीने युपीआय ॲपचा वापर करुन मोठया प्रमाणात पैश्याचे व्यवहार करण्यात येत आहेत. त्याकरीता PayTM, Phone Pay, Google Pay, Amazon Pay यासारख्या डिजिटल पेमेंट ॲप्लिकेशनचा वापर होतो. PayTM, Phone Pay, Google Pay, Amazon Pay यांचे अनेक बनावट ॲप इंटरनेटवर उपलब्ध असुन त्याद्वारे डिजिटल पेमेंट न करता पेमेंट केल्याचे भासवुन फसवणुक केल्याचे प्रकार उघडकीस आलेले आहेत. हा फसवणुकीचा नवीन प्रकार असुन बनावट पेमेंट केल्याचे नोटिफिकेशन दाखवुन प्रत्यक्षात पेमेंट न करता पेमेंट केल्याचे भासवुन फसवणुक केल्याने मध्यप्रदेश, छत्तीसगढ व हैद्राबाद या राज्यात गुन्हे नोंद आहेत. विशेषत: दुकानदार, हॉटेल व्यायसायिक, विविध लहान मोठया व्यापारी आस्थापना यांची फसवणुक करण्याच्या घटना घडल्या आहेत. **बनावट डिजिटल ॲपची उदाहरणे-** PRANK PAYMENT APP, MONEY PRANK PRO, PAYTM SPOOF, SCHREENSHOT GENERATOR etc..

<table>
<tr><th>Fake Payment App</th><th colspan="3">प्रत्यक्षात पैसे ट्रान्सफर न करता मोबाईलद्वारे दाखविण्यात येणाऱ्या संदेशाचे स्क्रिनशॉट</th></tr>
<tr>
<td>


</td>
<td>
</td>
<td>
</td>
<td>
</td>
</tr>
</table>

PayTM, Phone Pay, Google Pay, Amazon Pay इत्यादी डिजिटल पेमेंट ॲप्लिकेशनचा वापर करुन पैश्याचे व्यवहार केल्यावर सर्वप्रथम आपले डिजिटल ॲप चे खाते चेक करा. तसेच सदर डिजिटल ॲपशी सलग्न असलेल्या मोबाईल क्रमांकावर व्यवहाराबाबत एसएमएस आल्याची खात्री करावी. आपण वापरत असलेल्या PayTM, Phone Pay, Google Pay, Amazon Pay या डिजिटल पेमेंट ॲपची हिस्ट्री चेक व डिजिटल पेमेंट ॲपशी सलग्न बॅक खात्याती रक्कम आल्याची पडताळणी करुन प्रत्यक्ष व्यवहार पुर्ण झाल्याची खात्री करावी. इंटरनेटवर उपबल्ध बनावट पेमेंट **ॲप्लिकेशन** डाउनलोड करुन त्याद्वारे फसवणुक करण्याचा प्रयत्न केल्यास त्याबाबत तात्काळ स्थानिक पोलीस ठाणेस तक्रार करावी.